RP-19-20

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 234

## समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणिवा




अतिथी संपादक
डॉ. अशोक पंडित
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

कार्यकारी संपादक
डॉ. नरेंद्र गून
डॉ. ज्ञानेश्वर गवळीकार
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# समकालीन समाज, स्त्री आणि मराठी साहित्य

डॉ. राजाराम अं. झोडगे
मराठी विभाग प्रमुख,
नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी.
मो. नं. 9420786972
ई - मेल - rajanzodge@gmail.com

स्त्री आणि पुरुष या दोन घटकांच्या साहितत्त्वावर विश्वाचा गाडा चालतो. समाज सातत्य व प्रगती या दोन घटकांच्या परस्पर सहकार्यातूनच साकार होत असते. त्यामुळे त्यात लहान - मोठा असा कुठलाही भेद अनेसर्गिक ठरतो. परंतु येथील व्यवस्थेचा इतिहास पाहता समाजात स्त्री ही नेहमीच दुय्यम, कनिष्ठ ठरवली गेल्याचे दिसते. जीवनात आवश्यक एक वस्तू यापलीकडे तिचे स्वतंत्र असे अस्तित्व व्यवस्थेने मानले नाही. त्यामुळे एक माणूस म्हणून या विश्वाच्या संचालनातील एक अपरिहार्य घटक म्हणून स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व तिला निर्माण करता आले नाही. तशी पोषक परिस्थिती इथल्या व्यवस्थेत निर्माण होऊ शकली नाही. स्वातंत्र्य, समता, न्याय हे तिचे मुलभूत हक्क नाकारले गेले.

देशाला स्वातंत्र्य मिळाले. आपण संविधानाचा स्विकार केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये संविधानाने सर्वांना बहाल केली. आजचे एकविसावे शतक हे तर माहिति तंत्रज्ञानाचे, विज्ञानाचे, जागतिकीकरणाचे युग म्हणून ओळखले जाते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल झाला. शिक्षण, विज्ञान, संशोधन इ. चा प्रसार झाला. नवी जीवनमूल्ये, धारणा विकसित झाल्या. या सगळयांचा परिणाम म्हणून स्त्रीही बदलली. चूल आणि मूल यापलीकडे जाऊन ती शिकू लागली.

शिक्षण, वाचन यामुळे स्त्री सभोवतालाकडे निर्भीडपणे पाहू लागली. आपल्या स्वत्वाची ओळख, आपल्या क्षमता, आत्मभान यांमुळे सजग झालेली स्त्री जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले अस्तित्व आज सिध्द करु लागली आहे. शिक्षक, डॉक्टर, इंजिनीअर, अधिकारी, सैन्यदल, संशोधक, व्यावसायिक, आमदार, खासदार, मंत्री ते राष्ट्रपती अशा वेगवेगळ्या भूमिका ती समर्थपणे निभावत आहे. पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात ती अग्रेसर आहे. तिच्या जीवनजाणिवा विस्तारल्या आहेत. कुटूंब, नातेसंबंध सांभाळतांनाच व्यवसाय, गाव, राज्य, देश आपण सक्षमपणे सांभाळू शकतो हे तिने सिध्द केले आहे.

स्त्रीने आपल्या मर्यादांना भेदून आपली क्षमता सिध्द केली. घरात एक अनुत्पादक घटक, शोभेची वस्तू म्हणून राहणे नाकारुन ती अर्थाजन करु लागली आहे. ती बदलली परंतु समाज बदलला का ? समाजाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन बदलला का ? हा आज कळीचा प्रश्न बनला आहे. आज स्त्रीकडे लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन एक माणूस म्हणून पाहिले जाते का ? नियम, कायदे असले तरी प्रत्यक्षात खरेच तिला बरोबरीचे स्थान दिले जाते का ? अशा प्रश्नांची उत्तरे संदिग्ध आढळतात.

आज स्त्री कमावती असली तरी कुटूंब, व्यवसायाच्या निर्णयप्रक्रियेत तिचे मत विचारात घेतले जाते का ? तिनेच कमावलेले पैसे खर्च करण्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य तिला आहे का ? तर नाही. राजकीय क्षेत्रात महिलांना आरक्षण असल्यामुळे त्या निवडणूक प्रक्रियेत, विधिमंडळ, संसद, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिसतात खऱ्या परंतू काही अपवाद वगळता खरेच सत्ता स्त्रीच्या हाती असते का ? तर याचेही उत्तर बव्हंशी नकारात्मकच मिळते. नावापुरते महिलांना पुढे करुन खरी सूत्रे पुरुषांकडूनच हलवली जातात. तेच निर्णय घेतात. सरपंच, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेचे सभापती, नगराध्यक्ष अशा पदांवर निवडून आलेल्या महिलांचे पती, वडील, भाऊ किंवा कुटूंबातील अन्य पुरुष मंडळीच पदाधिकारी म्हणून मिरवत असतात. बरेचदा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सरपंच,

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

सभापती म्हणून पदाधिकारी महिलांच्या पतीनाच हारतुरे दिले जातात. हे समकालीन वास्तव आहे. स्त्रीच्या नावावर राजकारण होत असले तरी स्त्री सत्तेचे राजकारण होत नाही.

पूर्वी स्त्रीला दुर्गा, काली, देवी संबोधून तिला पूजले गेले. परंतु 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्वही नाकारले गेले. आजही आपण तिला सबला, नारीशक्ती, रणरागिणी म्हणून संबोधतो, गौरव करतो परंतु आजही तिच्याकडे एक वस्तू, मादी म्हणून पाहण्याची सामाजिक मानसिकता बदललेली दिसून येत नाही. टि.व्ही, वृत्तपत्रांमधून येणाऱ्या महिलांवरील अन्याय, अत्याचाराच्या बातम्या याची साक्ष देतात. दिल्लीतील निर्भया बलात्कार प्रकरण, कोपर्डी येथील बलात्कार व अमानुषता, हैद्राबाद येथे डॉक्टर युवतीला बलात्कार करुन जिवंत जाळण्याचे प्रकरण, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे शिक्षिकेला जिवंत जाळण्याचा प्रयत्न, औरंगाबाद येथे घरात घुसून महिलेला जिवंत जाळण्याचे कृत्य अशा अनेक घटना काय सांगतात ? समाजातील सडलेल्या मनोवृत्ती महिलांवरील अन्याय, अत्याचारावरच थांबत नाहीत तर जिवंत जाळणे, देहाची विटंबना करणे अशा विकृत, अमानुष कृती करताना दिसताहेत, अगदी चार - पाच वर्षांच्या निरागस मुलींपासून ते 60 वर्षांच्या वृध्दा स्त्रिया पुरुषी वासनेच्या शिकार झालेल्या दिसताहेत. यावरुन खरेच आम्ही स्त्रीकडे 'माणूस' म्हणून पाहतो आहोत का ? असा प्रश्न पडतो. स्त्रीदेहाच्या, बाईपणाच्या पलीकडे जाऊन महिलांचे माणूसपण हा समाज केव्हा स्विकारणार हा समकालीन ज्वलंत प्रश्न बनला आहे.

सभा - संमेलनांतून, व्यासपीठांवरुन स्त्री - पुरुष समानतेवर, न्याय, हक्कावर भाषणे झोडली जातात. कायद्याच्या राज्याची हाकाटी पिटवली जाते. परंतु प्रत्यक्षात समानता, कायदे कागदावरच राहून पुरुषप्रधान मानसिकता आजही कायमच असल्याचे दिसते. वंशाचा दिवा, स्त्रीभ्रूण हत्या, लग्नातील मानपान, खर्च, हुंडापध्दती इ. बाबींतूनच समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम, निम्नच राहिल्याचे दिसते.

आज माध्यमक्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. ऑनलाईन व्यापार वाढतो आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप अशा समाजमाध्यमांतून संदेशन अभिव्यक्ती होऊ लागली आहे. परंतु या माध्यमांतूनही स्त्रीचे एक वस्तू म्हणूनच प्रदर्शन होतांना दिसू लागले आहे. पुरोगामी म्हणवणाऱ्या समाजातही समाजमाध्यमांवर स्त्री ही टिंगल, उपहास, विनोदाचा विषय बनली आहे. चित्रपट, जाहिराती, मालिकांतून स्त्रीदेहाचे प्रदर्शन मांडले जाऊ लागले आहे. तात्पर्य अनेक समाजधुरिणांचे प्रयत्न, शिक्षणाचा प्रसार, स्त्रीचे सामर्थ्य, क्षमता, नवविचारांचे साहित्य, चळवळी एवढे होऊनही आज स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहण्याऐवजी एक भोगवस्तू म्हणून पाहण्याची मानसिकता संपलेली दिसत नाही.

प्रत्येक काळात आपल्यावरील अन्याय, शोषणाविरुध्द स्त्रीने आवाज उठवण्याचा प्रयत्न केला आहे. आजची स्त्रीही चळवळी, साहित्य निर्मितीच्या माध्यमातून लैंगिक भेदातून होणारे शोषण, विषमता यांच्याविरुध्द बंड पुकारताना दिसते आहे. विविध सामाजिकस्तर, घटकांतील स्त्रिया धीटपणे व्यक्त होऊ लागल्या आहेत. स्त्रीदेहाच्या पलीकडे जाऊन स्वत:चे अस्तित्व, आपल्या आयुष्याचा अर्थ तपासू लागल्या आहेत.

कुटूंबात वेगवेगळ्या भूमिका निभावत नातेसंबंधांना सांभाळत नोकरी, व्यवसाय, समाजकार्य करतांना होणारी ओढाताण, स्त्रियांच्या विविध समस्या, प्रश्नांचा धांडोळा घेणारी, प्रतिकुल परिस्थितीतही हार न मानता स्वत:च्या स्वत्वाचा शोध घेणारी साहित्य निर्मिती समकालीन स्त्री साहित्यिकांकडून होऊ लागली आहे. कविता महाजन, अश्विनी धोंगडे, मल्लिका अमरशेख, विद्या बाळ, नीरजा, सानिया, हिरा बनसोडे, अनुराधा पाटील, रेखा बैजल, ललिता गादगे, उर्मिला पवार, प्रतिभा इंगोले, संध्या रंगारी, प्रिया धारुरकर, मधू सावंत, अंजली जोशी, नजूबाई गावीत, वंदना महाजन, संजीवनी तडेगांवकर, वृपाली किन्हाळकर, कल्पना दुधाळ, योगिनी सातारकर अशा नव्या पिढीतील अनेक लेखिका आपल्या कथा, कविता, कादंबरी व अन्य साहित्य प्रकारांतून समकालीन स्त्रीजीवनाचे एक वास्तव चित्रित करु लागल्या आहेत.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

ISSN : 2348-7143
February-2020

स्वाभिमान जागृत झालेल्या या लेखिकांची लेखणी ही केवळ स्त्रियांचे प्रश्न मांडूनच थांबत नाही तर ती शोषणमुक्तीचा, स्वातंत्र्य, समतेचा, न्यायाचा आग्रह धरते, त्यासाठी प्रसंगी बंडखोरीची भाषा करतानाही ती कचरत नाही. स्त्री-पुरुष संबंध, लैंगिकता अशा विषयांवरही ती निर्भयपणे व्यक्त होत आहे. स्त्रीजाणिवांचे बदलते, विराट विश्व समकालीन मराठी साहित्यात प्रत्ययास येते आहे. स्त्रियांबरोबरच अनेक पुरुष लेखकांच्या साहित्यातूनही स्त्री दास्यमुक्तीचा आवाज बुलंद केला जातो आहे. समकालीन स्त्री असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर स्त्रीला गुलाम, वस्तू, अबला ठरवणाऱ्या मानसिकतेला, लैंगिक शोषण, विषमतेला नकार देणाऱ्या व स्त्रीच्या माणूसपणाचा आग्रह धरणाऱ्या साहित्यातून खऱ्या अर्थाने स्त्रीच्या शोषणमुक्तीची, समानतेची, न्यायाची, मूल्यांची वृध्दी समाजात व्हावी अशी आशा करुयात....

संदर्भ :

1. अस्मिता (स्मरणिका), 5 वे मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन माजलगांव, 2014
2. आमची श्रीवाणी, 'भारतीय स्त्रीवाद : बदलते आयाम' विशेषांक, ऑक्टों 2016 ते जानेवारी 2017.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani